**(वेळ -३ तास)** **[ एकूण गुण: १००]**

**सूचना : (१) सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.**
**(२) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.**

प्र. १) अ) शाहिरी वाङ्‌मयाचे स्वरूप विशद करून ‘पोवाडा’ या काव्यप्रकाराची वैशिष्ट्ये साधार स्पष्ट करा. २०

**किंवा**

आ) अनंत फंदी आणि होनाजी बाळा यांच्या शाहिरी लेखनाचा आढावा घ्या.

प्र. २) अ) दत्त आणि नाथ पंथीयांच्या लिखित साहित्याचे स्वरूपविशेष सोदाहरण स्पष्ट करा. २०

**किंवा**

आ) समर्थ रामदास यांच्या साहित्यलेखनाचा थोडक्यात आढावा घ्या.

प्र. ३) अ) ख्रिस्ती धर्मियांनी मध्ययुगीन मराठी साहित्याला दिलेले योगदान सोदाहरण स्पष्ट करा. २०

**किंवा**

आ) हुसेन अंबरखान आणि शहा मुंतोजी या इस्लामी संतकवींच्या वाङ्‌मयीन कार्याचा सविस्तर आढावा घ्या.

प्र. ४) अ) बखरीतील कथारचनेची वैशिष्ट्ये सांगून शिवपूर्वकालीन बखरींचा परिचय करून द्या. २०

**किंवा**

आ) बखर वाङ्‌मयाचे स्वरुपविशेष सांगून दोन पेशवेकालीन बखरींची सविस्तर माहिती द्या.

प्र. ५) खालीलपैकी **कोणत्याही दोन** टिपा लिहा. २०

१. लावणीची ठळक वैशिष्ट्ये

२. नाथ संप्रदायाचे कार्य

३. ख्रिस्तपुराण

४. सभासदाची बखर

*************



munotes.in